# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

# वार्षिक अहवाल : सन २०२४-२०२५

# अनुक्रमणिका


| **अ.क्र.** | **तपशिल** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्थापना व कार्ये | ०३ |
| २ | संचालक मंडळ | ०४ |
| ३ | व्यवस्थापन | ०६ |
| ४ | वित्तीय स्थिती | ०८ |
| ५ | इतर विभाग | |
| | (अ) बाजार समिती विभाग | ११ |
| | (ब) निर्यात विभाग | १३ |
| | (क)प्रकल्प विभाग | २५ |
| | (ड) अभियांत्रिकी विभाग | २६ |
| | (इ) संगणक विभाग | ३० |
| | (ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग | ३२ |
| | (प) देशांतर्गत व्यापार विकास विभाग | ३५ |
| | (फ) तळेगाव शेती विभाग | ४३ |

# १. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने ४१ वे वर्ष पूर्ण केले आहे व कृषि पणन मंडळाचा ४१ वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी प्रयत्न केले आहेत.

## उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे.
२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.
३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.
४. बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.
५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.
६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.
७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.
८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.
९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.
१०. या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.
११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

# २. संचालक मंडळ

| अ.क्र | संचालकाचे नाव |
|---|---|
| १ | **मा.ना.श्री.अब्दुल सत्तार दि.२६/११/२०२४ पर्यत**<br>मा.मंत्री,अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन, महाराष्ट्र राज्य,<br>मंत्रालय, मुंबई ३२. तथा मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br><br>**मा.ना.श्री.जयकुमार रावल दि. २१/१२/२०२४ पासून**<br>मा.मंत्री पणन व राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य, तथा<br>मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| २ | **मा. राज्यमंत्री , पणन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२**<br>तथा मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ३ | **मा.आ.श्री.चरणसिंग ठाकूर**<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, काटोल, जि. नागपूर तथा<br>सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ४ | **मा.श्री.शैलेश कोथमिरे दि.१/४/२०२४ ते दि. २७/५/२०२४ पर्यत**<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br><br>**मा.दिपक तावरे (भा.प्र.से) दि. २८/५/२०२४ पासून**<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ५ | **मा.चिफ जनरल मॅनेजर,**<br>नाबार्ड प्रतिनिधी, पुणे. तथा पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ६ | **मा.डॉ.प्रविण गेडाम, भा.प्र.से. दि. ३१/५/२०२४ पर्यत**<br>आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br><br>**मा.श्री.रावसाहेब भागडे (दि.४/६/२०२४ ते २५/६/२०२४)**<br>महासंचालक,महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद तथा<br>आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे. तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br><br>**मा.रविंद्र बिनवडे (भा.प्र.से.) (दि.२७/६/२०२४ ते ३१/१२/२०२४)**<br>आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे. तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br><br>**मा.सुरज मांढरे (भा.प्र.से) (दि. १/१/२०२५ पासून)**<br>आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे. तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ७ | **मा.श्री.भवेश कुमार जोशी**<br>सहाय्यक उपकृषि पणन सल्लागार, प्रादेशिक कार्यालय, मुंबई. तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |

| अ.क्र | संचालकाचे नाव |
|---|---|
| ८ | **श्री.केशवराव यादवराव तायडे दि.१५/७/२०२४ पासुन**<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर तथा<br>सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ९ | **श्री.नारायण बाजीराव पाटील दि.२६/३/२०२५ पासून**<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचा, जि.धुळे तथा<br>सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| १० | **श्री.संजय सदाशिव काजळे (पाटील) दि.२६/३/२०२५ पासून**<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, मलकापूर, जि.बुलढाणा तथा<br>सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| ११ | **मा.श्री.प्रविणकुमार बन्सीलाल नाहाटा**<br>**सभापती**, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या., पुणे तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| १२ | **मा.श्री.विकास रसाळ**<br>पणन संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे तथा<br>पदसिध्द सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |
| १३ | **मा.श्री.संजय कदम**<br>कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे तथा<br>सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे |

# ३. व्यवस्थापन

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री.संजय कदम | | कार्यकारी संचालक |
| २. | श्री.विनायक कोकरे | | सरव्यवस्थापक |
| ३. | श्री.सुधीर कोसलगे<br>(अतिरिक्त पदभार)<br>उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी) | | अभियांत्रिकी |
| ४. | श्री. एम.ई.कदम<br>सहाय्यक सरव्यवस्थापक<br>श्री.एस.पी.काळे- व्यवस्थापक | दि.११/३/२०२५ पर्यत<br><br>दि.१२/३/२०२५ पासून | देशांतर्गत व्यापार विकास |
| ५. | श्री.एम.एल.लोखंडे<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | | संगणक |
| ६. | श्री.एम.पी.पवार<br>सहाय्यक सरव्यवस्थापक<br>श्री.एम.ई.कदम<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | दि. १६/३/२०२५ पर्यत<br><br>दि.१७/३/२०२५ पासून | प्रकल्प व बी.डी.पी.<br><br>प्रकल्प |
| ७. | श्री. ए.पी.पाटील<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | | जनसंपर्क व प्रसिध्दी |
| ८. | श्री.जे.जे.जाधव<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | | बाजार समिती |
| ९. | श्री.बी.जी.कातोरे<br>सहाय्यक सरव्यवस्थापक | | अंशदान , कर्ज वसुली,<br>शेतमाल तारण योजना |
| १०. | श्री. एस.पी.बाजारे<br>व्यवस्थापक | | रा.कृ.वि.यो.- अभियांत्रिकी,<br>मालमत्ता |
| | श्री. जयंत कोकणे<br>व्यवस्थापक | | वित्त व लेखा |
| ११. | श्री.एस.व्ही वराडे<br>व्यवस्थापक | | निर्यात |
| १२. | श्री.शैलेंद्र जाधव<br>व्यवस्थापक | | प्रशासन |
| १३. | श्री.एस.डी.मेहेरकर<br>(अतिरिक्त पदभार) व्यवस्थापक | | शेती (तळेगाव) |
| १४. | श्री.व्ही.जे.राणे<br>विधी अधिकारी | | विधी |

## उपसरव्यवस्थापक/ सहायक सरव्यवस्थापक / व्यवस्थापक (विभागीय कार्यालये)

| क्र. | विभाग प्रमुखाचे नाव व पदनाम | विभाग |
|---|---|---|
| १. | श्री.एम.जी.जोशी<br>उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार) | रत्नागिरी |
| २. | श्री. एस.एस.घुले<br>उपसरव्यवस्थापक | कोल्हापूर |
| ३. | श्री.आर.आर.महाजन<br>उपसरव्यवस्थापक | पुणे |
| ४. | श्री.एस.वाय. पुरी<br>उपसरव्यवस्थापक | नाशिक |
| ५. | श्री. जी.सी.वाघ<br>उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार) | छत्रपती संभाजीनगर |
| ६. | श्री.एम.डी.बरडे<br>उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार) | लातूर |
| ७. | श्री.डि.एम.डागा<br>उपसरव्यवस्थापक (अतिरिक्त पदभार) | अमरावती |
| ८. | श्री.ए.बी.कडू<br>उपसरव्यवस्थापक | नागपूर |

# ४. वित्तीय स्थिती

## उत्पन्नाची साधने

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम क्र. ३९(ल) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पन्नाची साधने ही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून जमा होणारे वार्षिक अंशदान, कर्जावरील व्याज, गुंतवणूकीवरील व्याज, निर्यात सुविधा केंद्रे व इतर उत्पन्न ही आहेत.

सदरच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून कृषि पणन मंडळाच्या आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च व इतर विकासात्मक कामांबाबतचा खर्च भागवून उर्वरीत रक्कम बाजार समित्यांना विकासात्मक कामांसाठी निधी म्हणून देण्याची तरतूद वरील कायदा कलम ३९ (ल) (३) मध्ये नमुद केली आहे. त्यानुसार दिनांक ३१/०३/२०२५ अखेर कृषि पणन मंडळास प्राप्त झालेले उत्पन्न व त्याचा विनियोग याबाबतची माहिती खालीलप्रमाणे;

### ताळेबंद - २०२४-२०२५

(रु. कोटीत)

| अ.क्र | देयता | रक्कम रु. | संपत्ती | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मार्केटिंग फंड | ६१४.६६ | स्थावर मालमत्ता | २८५.४६ |
| २ | चालु देयता | १०.३५ | गुंतवणुक | ४८९.६८ |
| ३ | अनुदान ( अपेडा व इतर) | २६०.८८ | बँकेतील शिल्लक | ३०.७० |
| ४ | मार्केटिंग एक्सटेन्शन फंड | ७.२० | अखेरच्या मालाचा साठा | ०.०१ |
| ५ | कांदा निर्यात डेव्हलपमेंट एक्सटेंशन फंड | ४८.४७ | बाजार समिती कर्ज येणे | ८०.०२ |
| ६ | अनुदान - आर.के.व्ही.वाय, डी.एम.आय. | १०.६० | चालु देयता | १०६.८२ |
| ८ | तरतुद | १५०.५८ | आयकर | ११०.०५ |
| | **एकुण** | **११०२.७४** | **एकुण** | **११०२.७४** |

### उत्पन्न व खर्च - २०२४-२०२५

(रु. कोटीत)

| अ.क्र. | खर्च | रक्कम रु. | उत्पन्न | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | २४.३५ | बाजार समिती कर्जावरील व्याज | ३.९० |
| २ | प्रशासकीय खर्च | ६.४५ | गुंतवणुकीवरील व्याज | ३४.६९ |
| ३ | निर्यात सुविधा केंद्रे खर्च | २.५७ | प्रकल्प सल्ला विभाग | ०.०० |
| ४ | निर्यातवृध्दी | ०.४८ | निर्यात सुविधा केंद्रे उत्पन्न | ७.९६ |
| ५ | विकास व प्रकल्प | २.०८ | कृषि पणन मित्र वर्गणी | ०.२६ |
| ६ | घसारा | ११.६५ | इतर उत्पन्न | २.८७ |
| ७ | तरतुद | ५.९४ | तुट | ३.८३ |
| | **एकुण** | **५३.५२** | **एकुण** | **५३.५२** |

मंडळाचे अतिरिक्त निधी शासकीय व शेड्युल्ड बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणुकीवरील व्याजाचे उत्पन्न सरासरी ७.३५ टक्के दराने मिळाले असून अहवाल वर्षातील भांडवली बाजारातील व्याजदर ५.१० टक्के ते ७.९० टक्के विचारात घेता मिळालेले उत्पन्न निश्चित चांगले आहे.

**लेखे तपासणी**

पणन मंडळाचे वैधानिक लेखा परिक्षण मार्च २०२२-२०२३ अखेर व अंतर्गत लेखापरिक्षण व कर लेखा परिक्षण मार्च २०२४ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

## सन २०२५-२०२६ अर्थसंकल्प - उत्पन्न

(रु.कोटीत)


| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंशदान | ५०.०० | ४०.०४ |
| २ | कर्ज वसुली | २०.०० | १६.०२ |
| ३ | कर्जावरील व्याज (बा.स. व इतर) | ५.०० | ४.०० |
| ४ | गुंतवणुकीवरील व्याज | ३२.०० | २५.६३ |
| ५ | घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम | २.०० | १.६० |
| ६ | निर्यात सुविधा केंद्र उत्पन्न | १०.०० | ८.०१ |
| ७ | इतर उत्पन्न | ५.८७ | ४.७० |
| | **एकुण** | **१२४.८७** | **१००.००** |

## सन २०२५-२०२६ अर्थसंकल्प - विनियोग


(रु. कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाजार समिती कर्ज वाटप व अनुदान वाटप | ४३.१० | ३५.७८ |
| २ | आस्थापना, प्रशासकीय व इतर खर्च | ५०.९१ | ४२.२६ |
| ३ | घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम | ४.२० | ३.४९ |
| ४ | भांडवली खर्च (मुख्यालय, निर्यात सुविधा केंद्रे व इतर) | १९.९५ | १६.५६ |
| ५ | इतर भांडवली खर्च | २.३१ | १.९२ |
| | **एकुण** | **१२०.४७** | **१००.००** |

## सन २०२५-२०२६ अर्थसंकल्प — उत्पन्न




## सन २०२५-२०२६ अर्थसंकल्प — विनियोग



# ५. इतर विभाग

## अ ) बाजार समिती विभाग

दि.१ एप्रिल २०२४ ते दि.३१ मार्च २०२५ या अहवाल वर्षात राज्यात एकुण ३०४ बाजार समित्यां व ६२६ उपबाजार कार्यरत आहेत. बाजार समित्या राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. राज्यातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे;

| अ. क्र. | विभाग | मुख्य बाजार | उपबाजार |
|---|---|---|---|
| १) | रत्नागिरी | २० | ४१ |
| २) | नाशिक | ५३ | १३१ |
| ३) | पुणे | २३ | ६५ |
| ४) | छत्रपती संभाजीनगर | ३५ | ७६ |
| ५) | लातूर | ४७ | ८० |
| ६) | अमरावती | ५५ | १०२ |
| ७) | नागपूर | ५० | ८३ |
| ८) | कोल्हापूर | २१ | ४८ |
| | **एकूण** | **३०४** | **६२६** |

### १) अंशदान :

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ (२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण २९७ कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली.

**आकडेवारी (रु.लाखात)**

| दि.३१/०३/२०२४ अखेर थकीत अंशदान रु. | सन २०२३-२४ ची अंशदान आकारणी रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. | वसूल अंशदान रक्कम रु. | येणेबाकी अंशदान रु. |
|---|---|---|---|---|
| १०९६.७१ | ५५८२.९२ | **६६७९.६३** | **५३८१.६८** | **१२९७.९५** |

### २) कर्ज :

- **विकासात्मक कर्ज :**

कृषि पणन मंडळामार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यावर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंम्पाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत गाळे तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामांचा समावेश होतो.

अहवाल वर्षात कृषि उत्पन्न बाजार समित्यांना विविध विकासात्मक कामे व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गोदाम व धान्य चाळणी यंत्र उभारणीसाठी तसेच ई-नाम योजनेअंतर्गत धान्य चाळणी यंत्र उभारण्यासाठी एकूण रक्कम रु.३,५९,४८,९३८/- इतके कर्ज वितरित करण्यात आलेले आहे.

- **मुदती कर्ज -**

| अ.क्र. | बाजार समिती संख्या | व्याजदर | अदा रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ६ % | १,७८,३१,३२० | विविध विकासात्मक कामे करण्यासाठी. |
| २ | -- | ३ % | १,८१,१७,६१८ | राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गोदाम बांधकाम व धान्य चाळणी यंत्र उभारणीसाठी. |
| | **एकूण कर्ज अदा रक्कम** | | **३,५९,४८,९३८** | |

**कर्ज व्याजदर** -

१) दि.९/३/२०१६ चे परिपत्रकान्वये राज्यातील सर्व बाजार समित्यांसाठी विविध विकसन कामांसाठी देण्यात येणाऱ्या दिर्घ व अल्प मुदती कर्जावर ६ टक्के व्याजदर लागू करण्यात आलेला आहे.

२) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत समावेश असलेल्या बाजार समित्यांना गोदाम व धान्य चाळणी यंत्र उभारणी तसेच ई-नाम योजनेअंतर्गत समावेश असलेल्या बाजार समित्यांना धान्य चाळणी यंत्र उभारणी करण्यासाठी देण्यात येणाऱ्या मुदती कर्जावर ३% व्याजदर लागू करण्यात आलेला आहे.

## ३) अर्थसंकल्प मंजुरी -

अहवाल वर्षात महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३८ आणि त्याखालील नियमातील संबंधित नियमान्वये कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पुढील वर्षाचे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात येते. त्यानुसार २८६ बाजार समित्यांचे सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे १५२ बाजार समित्यांचे सन २०२४-२५ चे पुरवणी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आले. तसेच ८४ बाजार समित्यांची सन २०२३-२४ चे पुनर्विनियोजन पत्रके मंजूर करण्यात आली.

# ब) निर्यात विभाग

राज्यातील कृषि मालाची निर्यात वाढावी व त्यासाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरिता विविध कार्यशाळेच्या माध्यमातून शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यासाठी कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ.साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशील आहे.

## निर्यात वृध्दीकरिता पायाभूत सुविधांची उभारणी

राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब व फुले या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब या कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी राज्यात खालीलप्रमाणे पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली आहे.

**निर्यात सुविधा केंद्राचा प्रकार व संख्या तपशील**

| अ.क्र. | सुविधा | संख्या |
|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र | २५ |
| २. | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र | २० |
| ३. | फुले निर्यात सुविधा केंद्र | ३ |
| **एकूण** | | **४८** |

**विभागनिहाय निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील**

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | घटक | |
| पुणे | १ | शेतमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे | शिवलीलानगर, इंदापूर – अकलुज रोड, ता.इंदापूर, जि.पुणे | हाताळणी यंत्रणा | १० मे. टन / तास | निरंक |
| | | | | कांदा साठवणूक सुविधा | ५०० मे. टन | |
| | | | | निर्यातदार गाळे | ३६० स्के.मी | |
| | | | | प्रशासकीय इमारत | २३३ स्के.मी. | |
| | २ | फळे व भाजीपाला सुविधा केंद्र,इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे | कोल्ड स्टोरेज<br>प्रिकुलिंग | ३ x ४० मे. टन<br>५ मे. टन/बॅच | निरंक |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | आईस स्टोरेज | ४० मे. टन | |
| | | | | आईस टँक | ५ मे. टन /दिवस | |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | घटक | |
| | ३ | केळी निर्यात सुविधा केंद्र इंदापूर, जि.पुणे | कृषि उत्पन्न बाजार समिती, इंदापूर, मुख्य बाजार, इंदापूर-अकलुज रोड, शिवलिला मार्केट, ता. इंदापूर, जि. पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | १८४८ केळी |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ४ x २५ मे. टन | |
| | | | | दोन पॅकहाऊस (वालचंदनगर व अकलुज) | ४८८५ स्क्वे. फुट प्रत्येकी | |
| | | | | डि.जी. सेट | १७५ KVA | |
| | ४ | द्राक्षे व डांळिब निर्यात सुविधा केंद्र,बारामती, जि.पुणे | जळोची, ता. बारामती, जि.पुणे, | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ४३९.६२ आंबा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४०३५ स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | ५ | फुले निर्यात सुविधा केंद्र, तळेगांव (दा), ता.मावळ, जि.पुणे | महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (फ्लोरीकल्चर पार्क) जोग सेंटर - एमआयडीसी, तळेगाव, जि.पुणे | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | ५५ गुलाब फुले व आंबा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | २०० KVA | |
| | ६ | निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव, ता. मावळ, जि. पुणे. | हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ४३.४३ गुलाब |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाउस | ८०० स्क्वे. फुट | |
| | ७ | फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, जळोची, ता.बारामती, जि. पुणे | जळोची, ता.बारामती, जि. पुणे | प्रि-कुलींग | ३० मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | पॅक हाऊस | ११४६ चौ. मी., | |
| | | | | एरियल पॅक हाऊस | ६४३ चौ. मी | |
| | | | | ग्रेडींग सॉर्टींग पॅकींग लाईन फॉर ग्रेप्स- | २ मे.टन/प्रती तास | |
| | | | | ग्रेडींग सॉर्टींग पॅकींग लाईन फॉर बनाना- | २ मे.टन/प्रती तास | |
| | | | | ग्रेडींग सॉर्टींग पॅकींग लाईन फॉर पमोग्रनेट- | १.५ मे.टन/प्रती तास | |
| | | | | फ्रोजन फ्रुट | २५ मे. टन | |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | घटक | |
| | | | | स्टोअर | | |
| | | | | ब्लास्ट फ्रिजर | ५ मे. टन प्रति बॅच | |
| | | | | प्रि-कुलींग | ३० मे. टन. / बॅच | |
| कोल्हापूर | ८ | डाळिंब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि. सांगली | कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | २००० स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | २०० KVA | |
| | ९ | फुले निर्यात सुविधा केंद्र, सातारा, जि. सातारा | अजिंक्यतारा शेतकरी सहकारी फळे, फुले व भाजीपाला खरेदी विक्री संस्था मर्या. ता. जि.सातारा | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | १५ काजू |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| रत्नागिरी | १० | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे, जि. रत्नागिरी | शांतीनगर, नाचणे रोड, ता. जि. रत्नागिरी | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ८०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | ११ | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ९०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १२ | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र सुविधा केंद्र, जामगे, जि. रत्नागिरी | जामगे ता.खेड जि. रत्नागिरी | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ४० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ५७७८ स्क्वे. फुट | |
| | | | | डी.जी. सेट | २५० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| नवी मुंबई | १३ | विकीरण सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई. | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं. २ समोर, वाशी, नवी मुंबई. | रॅडिएशन सोर्स | कोबाल्ट ६० | १००३ आंबा, मसाले पदार्थ, आटा,मैदा, |
| | | | | सोर्स तिव्रता | ५०० कि.क्युरी | |
| | | | | रॅडिएशन युनिट (आंबा) | ५ मे. टन / तास | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ७६ मे.टन | |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | घटक | |
| | | | | डि.जी.सेट | ५०० KVA | सुजी, मसाले पदार्थ पशुखाद्य, |
| | | | | ट्रान्सरफॉर्मर | ५०० KVA | |
| | १४ | भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई. | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | प्रिकुलिंग | ५ मे.टन / तास | ४२८२ फळे व भाजीपाला, आंबा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ९८ मे.टन | |
| | १५ | व्हेपर हीट ट्रीटमेंट, वाशी, नवी मुंबई (व्ही.एच.टी.) | निर्यात भवन, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती,भाजीपाला बाजार आवार, सेक्टर नं.२१,वाशी, मुंबई. | व्हि.एच.टी. मशिन | १.५ मे.टन / बॅच | १२१४ आंबा, सिताफळ, चिकु, फळे व भाजीपाला |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४००० स्के.फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ४३२ नग | |
| | | | | ॲल्युमिनीअम पॅलेट | १२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ५०० KVA | |
| **नाशिक** | १६ | कांदा, द्राक्ष व डाळिब निर्यात सुविधा केंद्र, कळवण, ता. कळवण, जि. नाशिक | मु.पो.भेंडी, ता. कळवण, जि. नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४३५० स्के.मी. * २ | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | कांदा साठवणूक | ८ x ५० मे.टन | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १६० KVA | |
| | १७ | कांदा निर्यात सुविधा केंद्र चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदवड मौजे. चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ४७६५ क्स्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | कांदा चाळ | ३५० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ५०० नग | |
| | १८ | फुले निर्यात सुविधा केंद्र, मोहाडी, ता.दिंडोरी, जि.नाशिक | कृषि उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी, उपबाजार आवार, मोहाडी, गट नं.१२८६ ता. दिंडोरी, जि.नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच x २ | ३३०९ द्राक्ष |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | २०० KVA | |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | घटक | |
| | | | | | | |
| | १९ | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा, ता.रावेर, जि.जळगाव | कृषि उत्पन्न बाजार समिती, रावेर, ता.रावेर, जि.जळगाव | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २० | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, खडकेवाके, ता.राहता, जि.अहमदनगर | मौजे- खडकेवाके, ता.राहाता, जि. अहमदनगर | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६९६४ स्क्वे.फुट | |
| | | | | हँडलिंग लाईन | २ मे.टन / तास | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **छत्रपती संभाजीनगर** | २१ | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना, ता. जालना, जि.जालना | कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना, मार्केट यार्ड, जालना, जि.जालना | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ३७२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २२ | केळी निर्यात सुविधा केंद्र , वसमत, ता. वसमत, जि. हिंगोली | गट नं. १६७, तालुका बीज गुणन केंद्र, ता.वसमत, जि. हिंगोली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन/बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | २३ | फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, पाचोड, ता. पैठण, जि. | पाचोड, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन - ४ नग | निरंक |
| | | | | प्रिकुलिंग | ६ मे. टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६६७४ स्क्वे. फुट | |

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ट घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | घटक | |
| | | छत्रपती संभाजीनगर | | ग्रेडींग लाईन | १० मे. टन. / बॅच | |
| **लातूर** | २४ | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, बीड, ता.जि. बीड | कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, ग्रामपंचायत बहीरवाडी, ता. जि. बीड. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | १० मे.टन | |
| | | | | पॅक हाऊस | ३८७५ स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २५ | आंबा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, लातूर, ता.जि.लातूर | एमआयडीसी, लातूर प्लॉट क्रमांक डी -१ / १ न्यू एमआयडीसी, वेअरहाऊस गोडाऊन, बार्शी रोड जवळ ता.जि.लातूर | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ९७ आंबा, लिंबु |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट | १००० नग | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | २५० KVA | |
| | २६ | सिताफळ हाताळणी सुविधा केंद्र, बीड, जि.बीड | कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, नवीन मोंढा, बीड जि. बीड | कोल्ड स्टोरेज | २५० मे. टन x २ नग | निरंक |
| | | | | ब्लास्ट फ्रिजर | ५ मे. टन/ बॅच | |
| | | | | पल्पिंग युनिट | ५०० कि. ग्रॅ. / तास | |
| **अमरावती** | २७ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरुड, ता. वरुड, जि. अमरावती | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि शेती माल प्रक्रिया, पणन सहकारी संस्था मर्या., वरुड, ता. वरुड, जि. अमरावती | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | ग्रेडिंग लाईन | २ मे.टन/ तास | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA, ३० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | १६० KVA | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| **नागपूर** | २८ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा ). ता. कारंजा घाडगे जि. वर्धा | कारंजा घाडगे, ता. कारंजा घाडगे, जि.वर्धा | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | निरंक |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन | |
| | | | | पॅकहाऊस | ३३०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वॅक्सिंग युनिट | | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट | ७००० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |

## फळे व भाजीपाल्याकरिता आधुनिक सुविधा केंद्र (२०)

| विभागाचे नाव | अ. क्र | सुविधा केंद्राचे नाव | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | प्रक्रीया तपशील मे.टन |
|---|---|---|---|---|
| पुणे | १ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, शेलपिंपळगाव, ता. खेड,जि.पुणे | • कोल्ड स्टोरेज - २५ मे. टन<br>• प्रिकुलिंग - ५ मे.टन<br>• पॅक हाऊस एरिया - १०७.३० चौ.मी. (११५५ स्क्वे.फुट)<br>• डी.जी.सेट- ६२.५ KVA<br>• ट्रान्सफॉर्मर - १०० KVA<br>• अँन्टीरुम - ४२ चौ.मी.<br>• प्लँटरूम - ३९ चौ.मी.<br>• ऑफिस - ३२ चौ.मी.<br>• स्टोअर रूम - १७.३० चौ.मी.<br>• गाळे - ३ - ५४ चौ.मी.<br>• अंतर्गत रस्ते व संरक्षण भिंत, बाह्य विद्युतीकरण, प्लॅस्टिक क्रेट्स | निरंक |
| | २ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | | निरंक |
| कोल्हापूर | ३ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, मसूर, ता.कराड,जि. सातारा | | २९७<br>गुळ,मुग |
| | ४ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, म्हसवड, ता. माण, जि.सातारा | | २२०<br>हरभरा, मुग, तुर, आंबट चिंच बटाटा |
| | ५ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | | निरंक |
| रत्नागिरी | ६ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पालघर, ता. पालघर, जि. पालघर | | निरंक |
| नाशिक | ७ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, ठाणगाव, ता.सिन्नर, जि. नाशिक | | निरंक |
| | ८ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, लोणी, ता.राहाता, जि. अ.नगर | | निरंक |
| | ९ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे | | निरंक |
| | १० | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पाडळसा, ता. यावल, जि. जळगाव | | निरंक |
| औरंगाबाद | ११ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, करमाड,ता. जि.औरंगाबाद | | १११९.८० |
| | १२ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना | | निरंक |
| | १३ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, कळमनुरी, ता. | | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कळमनुरी, जि. हिंगोली | | |
| **अमरावती** | १४ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, चांदूररेल्वे, ता. चादुंररेल्वे, जि.अमरावती | | निरंक |
| | १५ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि. बुलढाणा | | ६.८<br>मिरची,भेंडी (सीड्स) |
| **लातूर** | १६ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड | | निरंक |
| | १७ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, माजलगाव, ता. माजलगाव, जि.बीड | | निरंक |
| **नागपूर** | १८ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर | | ५९०<br>संत्रा, मिरची ,हळद,धने पावडर, सोयाबिन,चना,धान इ. |
| | १९ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, मोहाडी, ता. मोहाडी, जि. भंडारा | | ९५<br>इतर कृषिमाल |
| | २० | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, पुलगाव, ता. देवळी, जि. वर्धा | | निरंक |

## १) भाजीपाला प्रक्रिया केंद्र (VPF), वाशी

युरोपियन युनियनने भारतातून आयात होणाऱ्या आंबा व पाच भाजीपाल्यावर आयात बंदी केली आहे. या पार्श्वभुमीवर कृषि पणन मंडळाने पुढाकार घेउन अपेडा यांच्या सहकार्याने व कृषि उत्पन्न बाजार समिती मुंबई यांच्या जागेवर वाशी येथे कृषि पणन मंडळामार्फत भाजीपाला प्रक्रिया केंद्राची उभारणी करणेत आली आहे. सदरील सुविधेवर आंबा, भेंडी, मिरची, कारले, वांगी व इतर भाजीपाला यावर हॉट वॉटर प्रक्रिया करण्यात येते. तसेच सदरील सुविधेवर प्रिकुलींग व कोल्डस्टोरेजची सुविधा देखील उभारण्यात आली आहे. सदर सुविधा वाशी येथे असल्याने ही सुविधा युरोपियन देशांमध्ये भाजीपाला निर्यात वृध्दीसाठी विशेष महत्वाची ठरली आहे. तसेच या सुविधेवर अमेरिका येथे आंबा निर्यातीकरिता आवश्यक असलेली हॉट वॉटर प्रक्रिया देखील करुन देण्यात येते. सदर सुविधेचा वापर विवीध खाजगी निर्यातदार, शेतकरी कंपनी, सहकारी संस्था यांच्यामार्फत केला जातो.

## २) विकीरण सुविधा केंद्र वाशी, नवी मुंबई

तब्बल १८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर सन २००६ मध्ये अमेरीकन बाजारपेठ भारतीय आंब्यासाठी खुली झाली होती. परंतु त्यासाठी प्राथमिक अट ही आंबा विकिरण प्रक्रिया करुन पाठवणे अशी होती. त्यासाठी पणन मंडळामार्फत बी.ए.आर.सी.च्या मालकीची कृषक विकिरण सुविधा वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर नव्हती. त्यामुळे निर्यातदारांच्या मागणीनुसार व अपेडाच्या मार्गदर्शनाने कृषि पणन मंडळामार्फत मोठ्या क्षमतेच्या विकिरण सुविधेची उभारणी वाशी, नवि मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना

यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत:चा अतिरिक्त निधी वापरुन सुविधा उभारणेचे कामकाज पूर्ण झाले असुन AERB, DAE, NPPO, USDA-APHIS, FSSAI चे प्रमाणीकरण पुर्ण झाले आहे. सदर सुविधेवरुन आंबा, डाळिंब, मसाल्याचे पदार्थ, पशुखाद्य, सुकामेवा, कांदा, आटा, मैदा, कडधान्य, औषधीकरीता डिंक इ. पदार्थावर निर्यातीकरीता प्रक्रिया करण्यात आली आहे.

## ३) व्ही. एच. टी. सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई

आंबा फळमाशी विरहित करण्यासाठी ही प्रक्रिया पध्दत अवलंबविली जाते. जपान, युरोपीयन देश, न्युझिलंड, मॉरिशस, साऊथ कोरिया इत्यादी देशांकडून आंबा आयाती पूर्वी सदर प्रक्रियाची मागणी केली जाते. पणन मंडळाने याकरिता १.५ मे. टन क्षमतेची व्ही. एच. टी. सुविधा वाशी, नवी मुंबई येथे उभी केली असून या द्वारे उपरोक्त देशांना प्रतिवर्षी सुमारे २५० मे. टन आंब्याची निर्यात करण्यात येते. तसेच सदर सुविधेवरील इतर घटकांचा वापर करुन फळे व भाजीपाल्याची सर्व प्रमुख देशांना निर्यातदारांमार्फत निर्यात केली जाते.

## निर्यात विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना व उपक्रम :-

## अ) कृषि मालाच्या निर्यातीकरिता नव्याने खुल्या झालेल्या देशांकरिता समुद्रमार्गे वाहतुकीसाठी रु.५०,०००/- प्रति कंटेनर अनुदान देणेबाबत योजना.

महाराष्ट्र राज्यातून कृषि मालाच्या निर्यातीस जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळावे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत सहकारी संस्था, शेतकरी, कंपनी, निर्यातदार, शेतकरी उत्पादक गट यांनी फळे व भाजीपाला ( द्राक्षे वगळून) या कृषि मालाच्या समुद्रमार्गे केलेल्या थेट निर्यातीस आर्थिक सहाय्य देण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा प्रस्ताव विचारार्थ होता. याबाबत पणन मंडळाच्या मा. संचालक मंडळ सभा क्र. १३४ दि. २.०७.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी रुपये १ कोटी इतकी रक्कम राखून ठेवावी असे ठरलेले आहे.

पणन मंडळाने कंटेनर भाड्यात सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी यांना अनुदान देण्याची सवलत दिल्यामुळे अशा संस्थांचा निर्यातीमध्ये सहभाग वाढेल अशी आशा असून सदर योजना खालील तक्यात नमुद केलेल्या देशात व विहित केलेल्या कृषिमालाची समुद्रमार्गे निर्यात करतील अशा सहकारी संस्था / शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी,कंपनी, निर्यातदार, शेतकरी उत्पादक गट यांना रु. ५०,००० /- प्रति कंटेनर (२० फुटी / ४० फुटी ) अनुदान देणेत येईल. अनुदानाची महत्तम मर्यादा प्रति लाभार्थी रु. १.०० लाख प्रति वर्ष एवढी राहील. योजनेसाठी २०२४-२५ या वर्षात आर्थिक तरतूद एकूण रु. १ कोटी करण्यात आलेली आहे.

## निर्यातीकरिता देश व उत्पादने

| अ.क्र. | देश | उत्पादने |
|---|---|---|
| १ | अमेरिका | आंबा , डाळींब |
| २ | ऑस्ट्रेलिया | आंबा |
| ३ | साऊथ कोरीया | केळी ,आंबा |
| ४ | कजाकिस्तान (via Bandar Abbas Port) | आंबा |

| अ.क्र. | देश | उत्पादने |
|---|---|---|
| ५ | अफगाणिस्तान (via Bandar Abbas Port) | केळी व कांदा |
| ६ | इराण | केळी, संत्रा,आंबा |
| ७ | रशिया | केळी , आंबा |
| ८ | मॉरिशस | कांदा, आंबा |
| ९ | लॅटव्हीया (Via Rega Port) | भाजीपाला व कांदा |
| १० | युरोपियन समुदाय | आंबा,डाळिंब, |
| ११ | कॅनडा | आंबा,डाळिंब, |
| १२ | सर्व देश | संत्रा |

## योजनेच्या अटी व शर्ती:

- सहकारी संस्था ,शेतक-यांची उत्पादक कंपनी, शेतकरी,निर्यातदार, कंपनी,शेतकरी गट, फर्म यांनी समुद्रमार्गे कंटेनरद्वारे थेट निर्यात (Direct Export) करणे बंधनकारक राहील.
- या योजनेचा लाभ फक्त महाराष्ट्रातील सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी, निर्यातदार, कंपनी, शेतकरी गट, फर्म यांना देय राहील.
- लाभार्थींनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्जासोबत संबंधित कागदपत्रे तसेच ज्या पुरवठादार कंपनीकडून कंटेनर उपलब्ध केलेला आहे त्याचे देयक सादर करणे बंधनकारक राहील.
- सदर योजना ही निश्चित केलेले देश व शेतमालाच्या उत्पादनासाठीच लागू राहील.
- व्यापा-यांनी सहकारी संस्थांच्या मध्यमातून निर्यात केल्यास अनुदान देय होणार नाही.
- निर्यातदार संस्था निर्यात केलेल्या मालाची विक्री रक्कम प्राप्त झाल्यानंतरच योजनेकरिता अर्ज करु शकतील, जेणेकरुन गुणवत्तेअभावी मालाची विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास अशा प्रस्तावांना अनुदान देय होणार नाही.
- कृषि मालाचा नमुना पाठविण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
- अनुदान संपूर्णपणे नामंजूर, अंशत: मंजुरी अथवा पूर्णपणे मंजूर करण्याचे सर्व अधिकार मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारास बंधनकारक राहील
- सदर योजना ही २०२४-२५ या कालावधीत समुद्रमार्गे निर्यात केलेल्या कृषिमाल व देश यासाठी लागू राहील.

## ब) राज्यातील इच्छूक शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी, शासकीय अधिकारी इत्यादींकरीता हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्सचे आयोजन.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत निर्यातपूरक उपक्रमांमध्ये वाढ करावी हा विचार करून "हॉर्टीकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्स" आयोजनास माहे डिसेंबर २०१५ पासुन सुरूवात करण्यात आलेली आहे. हा कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून तो प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजीत केला जातो. त्याचा कालावधी ५ दिवस आहे. संबंधित ट्रेनिंग चे प्रशिक्षण शुल्क निवास व्यवस्थेसह रू. ११,५०५/-, निवास व्यवस्थेशिवाय रू. ९,७३५/- व महिलांसाठी रू. ८,६३८/- (२५ टक्के सवलत) एवढ्या शुल्काची आकारणी करण्यात येत आहे. अहवाल वर्षात एकूण ६११ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले.

**प्रशिक्षणामध्ये पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात येते.**

- ताजी फळे व भाजीपाला निर्यात संधी व पणन मंडळाचे कार्य
- निर्यात प्रक्रिया, परवाने, नोंदणी व वीमा
- इनव्हॉईस, पॅकींग लिस्ट, इ. कागदपत्रांची तोंडओळख
- उत्पादनांचा अभ्यास, एच. एस. कोड, आंतरराष्ट्रीय परिस्थिती
- क्वालीटी पॅरॅमिटर्स, फायटो सॅनिटरी, ॲगमार्क स्टँडर्स, ट्रेसनेट, MRL/PHI
- पॅकींग, पॅकेजींग, एअर व सी शिपींग, CHA यांच्या जबाबदाऱ्या
- कृषिमालाची वाहतूक व पुरवठा यंत्रणा (स्थानिक, आंतरदेशीय)
- टर्मिनॉलॉजीज, UCPDC, बँकींग प्रक्रिया, पेमेंट रिस्क
- निर्यातदारांसाठी RKVY, APEDA, MEIS, शासनाच्या योजना
- निर्यातीसाठी प्रमाणपत्रे (GAP, Human Consumption etc.)
- सुविधा केंद्र गरज (IFC,VHT,HWIT,VPF,PC,CS,RC)
- फळ भाजीपाल्यावर विशेष प्रक्रिया पद्धती
- करार शेती व पणन कायद्यातील बदलामुळे पणन संधी

**नवनवीन कृषिमालाकरिता नवीन बाजारपेठा उपलब्ध होणेबाबत प्रयत्न:**

- केळी, डाळिंब व हिरवी मिरचीच्या अतीदुरवरील देशांना निर्यात करण्याकरिता समुद्रमार्गे वाहतुकीकरिता निर्यात प्रोटोकॉल विकसीत करण्याच्या अनुषंगाने मॅग्नेट प्रकल्पाच्या सहाय्याने वॅग्नेंगन युन्हिवर्सिटी, नेदरलॅड येथील तज्ञांच्या मार्गदर्शनाने चाचण्या घेण्यात येत आहे.
- राज्यामध्ये उत्पादित सिताफळ व चिकु यांच्या निर्यातीमध्ये अडसर ठरत असलेल्या फळमाशीवर उपाययोजना म्हणुन सदर फळांवर पणन मंडळाच्या व्ही.एच.टी. सुविधेवर यशस्वीरित्या चाचण्या घेण्यात आल्या असुन त्याची खाजगी निर्यातदारांमार्फत प्रायोगिक निर्यात करण्यात आली आहे.
- अंजीराची मर्यादित टिकवण क्षमता विचारात घेता सद्यपरिस्थितीमध्ये अंजीराची फारशी निर्यात होत नाही. पुरंदर हायलँड अंजीर शेतकरी उत्पादक कंपनी यांना अर्थसहाय्य देऊन त्यांच्या माध्यमातुन युरोप येथे अंजीराचे नमुने पाठवुन निर्यातीची सुरवात झाली आहे.

**नवीन बाजारपेठा उपलब्ध होणेबाबत प्रयत्न (रशिया येथे केळीची चाचणी निर्यात):**

- अतिदुरवरच्या देशांना समुद्रमार्गे निर्यात प्रोटोकॉल विकसित करण्याचे मॅग्नेट प्रकल्पातील घटक-१ मधील 'बाजार विकास व प्रोत्साहन' या घटकांतर्गत वॅगेनिंगेन युनिव्हर्सिटीचे तज्ञांच्या मार्गदर्शनाने कृषि पणन मंडळ व मॅग्नेट प्रकल्प मार्फत सिम्युलेशन ट्रायल्स ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२३ दरम्यान करण्यात आल्या आहेत.
- सदर अभ्यास व चाचण्यांमधुन अतिदुरवरच्या देशांना समुद्रमार्गे केळी वाहतुकीचा प्रोटोकॉल विकसीत करण्यात आला आहे.
- याचाच पुढील भाग म्हणुन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ व मॅग्नेट प्रकल्प यांच्या मार्गदर्शनाखाली रशिया येथील नोवोरोसिक या पोर्टवर ४० फुटी कंटेनर मध्ये २२ मे. टन केळीची समुद्रमार्गे चाचणी कन्साईनमेंट दि. १५ नोव्हेंबर, २०२४ रोजी निर्यात करण्यात आली.
- सदर कंटेनर रशिया येथे पोहोचला असुन त्याद्वारे सुमारे ८५-९० टक्के केळी उत्कृष्टरित्या पोहोचली आहे.

# क) प्रकल्प विभाग

## १) सल्ला सेवा

पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची दि. २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि.योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात. केंद्र शासनाच्या एकात्मिक कृषि पणन योजनेच्या कृषि पणन सुविधा या उपयोजने अंतर्गत पणन मंडळाकडे प्राप्त बाजार समित्यांचे प्रस्ताव योजनेच्या निकषाप्रमाणे तपासण्यात येतात.

आजपर्यंत प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु. २५० कोटी आहे.

## २) केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयामार्फत कार्यान्वित कृषी विपणन साठी एकात्मिक योजनेच्या (ISAM) कृषि विपणन पायाभूत सुविधा (AMI) योजना

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधा उभारुन मुल्यवृद्धी करण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयामार्फत सन २०१४ पासून Directorate of Marketing and Inspection (DMI) विभागामार्फत Agriculture Marketing Infrastructure (AMI) योजना राबवली जाते. सदर योजनेला केंद्र शासनाने दि.३१.०३.२०२६ अखेर मुदत वाढ देण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या या योजनेंतर्गत पणन मंडळाकडे २५ बाजार समित्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असुन सदर प्रस्ताव योजनेच्या निकषाप्रमाणे तपासुन २५ टक्के अनुदान मंजुरीकरीता पुढील कार्यवाहीसाठी कृषि विपणन सल्लागार, विपणन व निरिक्षण संचानालनालय, मुंबई यांना पाठविणेत आले आहे. सदरच्या प्रस्तावांची सद्यस्थिती पुढील प्रमाणे –

| अ.क्र. | प्रस्तावांचा तपशील | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | बा.समित्यांनी सादर केलेल्या प्रस्तावांची एकुण संख्या | २५ |
| २ | DMI कडे सादर केलेल्या प्रस्तावांची एकुण संख्या | २५ |
| ३ | बा.स एकुण प्रकल्प किंमत | २२७८१.०७ (रु. लाखात) |
| ४ | बा.स अंदाजित एकुण अनुदानाची रक्कम | ५७४७.४४ (रु. लाखात) |

# (ड) अभियांत्रिकी विभाग

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे - कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, जल नि:सारण व्यवस्था व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची, त्या अनुषंगाने येणाऱ्या कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. तसेच कृषि पणन मंडळामार्फत पणन मंडळाच्या स्वनिधी अथवा शासकीय अनुदानातुन उभारण्यात आलेली / येत असलेली शेतीमाल हाताळणी व प्रक्रिया प्रकल्पांची स्थापत्य विषयक व अनुषंगिक तांत्रिक कामकाज अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

अहवाल वर्षामध्ये (२०२४-२५) अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :

अ) अभियांत्रिकी विभागामार्फत खालील ८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्ताव त्रुटी पुर्तता प्रस्ताव / कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | बाजार समिती नाव व जिल्हा | अ.क्र | बाजार समिती नाव व जिल्हा |
|---|---|---|---|
| | **कर्ज मागणी / विनियोग दाखला प्रस्ताव** | | **कर्ज मागणी / विनियोग दाखला प्रस्ताव** |
| १ | महाड, जि. रायगड | ५ | मंगरूळपीर, जि. वाशिम |
| २ | वाई, जि. सातारा | ६ | काटोल, जि. नागपूर |
| ३ | नेवासा, जि. अहिल्यानगर | ७ | कळंब, जि. धाराशीव |
| ४ | अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर | ८ | संगमनेर, जि. अहिल्यानगर |

**ब**) महाराष्ट्र शासनामार्फत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित “महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क” (मॅग्नेट) प्रकल्पाअंतर्गत कृषि पणन मंडळाच्या अस्तित्वातील १६ सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण, २ सुविधांचे अपेडा प्रमाणिकरण आणि ३ नविन सुविधा १) बारामती, २) पाचोड ता. पैठण ३) बीड व रा.सु.प.तं.संस्था, तळेगांव संस्थेचे बळकटीकरण करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर कामांपैकी कृषि पणन मंडळाच्या अस्तित्वातील ६ सुविधा केंद्रांचे विस्तारीकरण / आधुनिकीकरण, २ सुविधांचे अपेडा प्रमाणिकरण आणि ३ नविन सुविधांची उभारणी इ. कामे पुर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर असुन सदर प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे आहे;

| क्र | सुविधा केंद्राचे नाव | प्रकल्प किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| **अ)** | **अस्तित्वातील सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण (एकूण १२ सुविधा) :** | |
| १ | निर्यात सुविधा केंद्र, जालना, जि. जालना. | १.२५ |
| २ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, करमाड, जि. छत्रपती संभाजीनगर | १.३२ |
| ३ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापूर, जि. नांदेड | ०.६४ |
| ४ | सुविधा केंद्र, लातुर, जि. लातुर | ३.५३ |
| ५ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, चांदुर रेल्वे, जि. अमरावती | २.८३ |
| ६ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा.), जि.वर्धा | ६.५६ |
| ७ | अपेडा प्रमाणिकरण : सुविधा केंद्र, वरुड, जि. अमरावती | ०.५६ |
| ८ | अपेडा प्रमाणिकरण : सुविधा केंद्र, बीड, जि.बीड | ०.४४ |
| ९ | निर्यात सुविधा केंद्र, कळवण, ता. कळवण, जि. नाशिक | ४.४३ |
| १० | निर्यात सुविधा केंद्र, सावदा, ता. रावेर, जि. जळगांव | ६.५९ |
| ११ | व्हेपर हिट ट्रिटमेंट सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | १.४९ |
| १२ | भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | ०.८४ |
| १३ | विकिरण सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | ०.८४ |
| १४ | निर्यात सुविधा केंद्र, रा. सु. प. तं. संस्था, तळेगांव दाभाडे , जि. पुणे | ४.८१ |
| १५ | निर्यात सुविधा केंद्र, मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक | ४.२५ |
| १६ | निर्यात सुविधा केंद्र, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | १.९४ |
| १७ | द्राक्ष व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे | ३.८४ |
| १८ | डाळींब निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि. सांगली | २.६३ |
| **ब)** | **नियोजित प्रकल्प :** | |
| १ | फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे | ५६.६३ |
| २ | फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, पाचोड, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | १८.८८ |
| ३ | सिताफळ हाताळणी सुविधा केंद्र, बीड, जि. बीड | ६.८४ |
| ४ | रा.सु.प.तं.संस्था, तळेगांव दाभाडे, जि. पुणे संस्थेचे बळकटीकरणांतर्गत विविध विकास कामे करणे. | १७.०५ |

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत व ई-नाम योजनेअंतर्गत मंजुर प्रकल्पांची अंमलबजावणी :

### १) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करणे –

धान्य साफसफाईसाठी व प्रतवारीसाठी धान्य चाळणी प्रतवारी यंत्र (Grain Cleaning and Grading Machine) सुविधा बाजार समितीच्या आवारामध्ये उभारणी केल्यास शेतकऱ्यांच्या शेतीमालास चांगला दर मिळू शकेल. याबाबीचा विचार करुन राज्यातील प्रामुख्याने धान्याची आवक असणाऱ्या बाजार समित्यांमध्ये नवीन धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी कृषि पणन मंडळामार्फत राष्ट्रीय कृषी विकास

योजनेकडे तसेच ई- नाम योजनेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राज्यातील ३१ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेच्या नवीन धान्य चाळणी यंत्राची सुविधा उभारणी करण्यासाठी दि. १५/१२/२०१७ रोजीच्या २४ व्या SLSC बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि.०४/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणुन नियुक्त करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि. २४/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये भारत सरकारच्या ई-नाम योजनेअंतर्गत राज्यातील ५५ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेचे एक धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली होती. या दोन्ही प्रकल्पांचा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| धान्य चाळणी प्रतवारी यंत्र प्रकल्प (क्षमता प्रत्येकी २ मे.टन प्रती तास) | एकुण अंदाजित खर्च | अनुदान | पणन मंडळ गुंतवणुक | बा.स.स्वनिधी गुंतवणुक/ पणन मंडळाचे कर्ज |
|---|---|---|---|---|
| **रा.कृ.वि.यो. : ३१ बा.स.** | २१.६९ | ५.०५ | ३.५० | १३.१४ |
| **ई-नाम : ५५ बा.स.** | ३८.४८ | १९.१६ | -- | १९.३२ |
| **एकुण** | **६०.१७** | **२४.२१** | **३.५०** | **३२.४६** |

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत व ई-नाम योजनेअंतर्गत या दोन्ही प्रकल्पांचा एकूण अंदाजित खर्च रु. ६०.१७ कोटी होता. या दोन्ही प्रकल्पांसाठी केंद्र शासनाचे अनुदान रु. २४.२१ कोटी, पणन मंडळाची गुंतवणूक रु.३.५० कोटी व उर्वरीत रक्कम रु.३२.४६ कोटी बाजार समिती स्वनिधी असा वित्तीय आराखडा होता. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना स्वनिधीची रक्कम गुंतवणूक करण्यासाठी आवश्यकतेनुसार पणन मंडळामार्फत ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले होते.

अहवाल वर्ष अखेरीस या दोन्ही प्रकल्पामध्ये रा. कृ. वि. यो. अंतर्गत २१ बाजार समित्यांमध्ये तर ई-नाम अंतर्गत २० बाजार समित्यांमध्ये अशा एकूण ४१ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी शेड बांधकाम व मशीनरी उभारणीचे काम पणन मंडळामार्फत पुर्ण झालेले असून सदर धान्य चाळणी शेड व मशीनरी वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. या दोन्ही प्रकल्पामध्ये रा. कृ. वि. यो. अंतर्गत १० बाजार समित्यांची कामे व ई-नाम अंतर्गत ३५ बाजार समित्यांची कामे प्रकल्पास प्रतिसाद नसल्याने अथवा इतर तांत्रिक कारणांमुळे कायमची रद्द करण्यात आलेली आहेत. या दोन्ही प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली असून या दोन्ही प्रकल्पांचे अनुदान उपयोगिता प्रमाणपत्र शासनाकडे सादर करण्यात आलेले आहे.

संबंधित बाजार समित्यांना, शेतक-यांना तसेच व्यापाऱ्यांना शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत धान्य खरेदी-विक्रीवेळी तसेच खुल्या बाजारामध्ये धान्य खरेदी-विक्रीवेळी धान्य साफसफाईसाठी व प्रतवारीसाठी या धान्य चाळणी यंत्रांच्या वापरामुळे फायदा होत आहे.

### २) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये एकूण १०८ गोदामांची उभारणी करणे –

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी ( Pledge Loan) व शासकीय हमीभाव खरेदी केंद्रा अंतर्गत शेतमाल साठवणुकीसाठी बाजार समित्यांचे आवारामध्ये एकुण १०८ गोदामांची उभारणी करण्यासाठी दि. २५/०७/२०१८ रोजीच्या रा. कृ. वि. यो. च्या २५ व्या SLSC बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि. १२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत राज्यातील एकूण १०८ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी १००० मेट्रिक टनाचे एक या प्रमाणे नवीन १०८ गोदामांची उभारणी करण्याचे प्रस्तावित होते. या प्रकल्पाचा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| गोदाम प्रकल्प | एकुण अंदाजीत खर्च | रा.कृ.वि.यो. अनुदान | पणन मंडळ गुंतवणूक | बा.स.स्वनिधी गुंतवणुक/ पणन मंडळाचे कर्ज |
|---|---|---|---|---|
| | १००% | ३६% | २०% | ४४% |
| रा.कृ.वि.यो. अंतर्गत राज्यातील बा.स. मध्ये प्रत्येकी १००० मे. टन. क्षमतेची एकुण १०८ गोदामे उभारणी करणे. | ११६.४६ | ४१.८६ | २३.१९ | ५१.४१ |

या प्रकल्पाचा एकूण प्रस्तावित खर्च रु. ११६.४६ कोटी असून त्यापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजने कडून ३६ % अनुदान रु. ४१.८६ कोटी, पणन मंडळामार्फत २० % गुंतवणूक रु. २३.१९ कोटी व बाजार समिती स्वनिधी ४४ % गुंतवणुक रु. ५१.४१ कोटी असा वित्तीय आराखडा आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना स्वनिधीची रक्कम गुंतवणूक करण्यासाठी आवश्यकतेनुसार पणन मंडळामार्फत ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

अहवाल वर्ष अखेरीस रा. कृ. वि. यो. अंतर्गत गोदाम प्रकल्पामध्ये एकूण १०१ बाजार समित्यांमध्ये गोदाम उभारणीचे काम पणन मंडळामार्फत पुर्ण करण्यात आलेले आहे व ७ बाजार समित्यांमधील गोदामांची कामे पूर्णत्वाकडे आलेली आहेत. कामे पूर्ण झालेले गोदाम प्रकल्प वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत व संबंधित बाजार समित्यांकडून त्याचा वापर धान्य साठवणुकीसाठी व शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी सुरु झालेला आहे. पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत धान्य साठवणुकीसाठी तसेच शासकीय हमीभाव खरेदी केंद्रा अंतर्गत धान्य साठवणुकीसाठी शेतक-यांना व बाजार समितीला या गोदाम प्रकल्पाचा फायदा होत आहे.

या योजनेमुळे राज्यामध्ये शेतीमाल साठवणुकीसाठी १,०८,००० मेट्रिक टन अतिरिक्त साठवणूक क्षमता निर्माण होत आहे.

# इ) संगणक विभाग

## १) ॲगमार्केनेट योजना

केंद्र शासनाच्या ॲगमार्केनेट योजने अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे. या योजने अंतर्गत राज्यातील ३०६ मुख्य बाजार व ६५ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

## २) राष्ट्रीय कृषि बाजार (eNAM) योजना

शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागा मार्फत राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) कार्यान्वित केले आहे. ई-नामचे कामकाज ई-ट्रेडींग प्लॅटफॉर्म द्वारे सुरु आहे. केंद्र शासनाकडून बाजार समित्यांना सॉफ्टवेअर, प्रशिक्षण व सेवा विनामूल्य देण्यात येत असून संगणक व ग्रेडींग सामुग्री खरेदीसाठी प्रति बाजार समिती रु.३०/- लाख अनुदान देण्यात येते. राज्यातील ११८ बाजार समित्या ई-नामला तीन टप्यात जोडण्यात आल्या आहेत. या बाजार समित्यांमध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री, असेईंग, ई-ऑक्शन व ई-पेमेंट बाबतचे काम सुरु झाले आहे. नव्याने १५ बाजार समित्या ई-नामला जोडणे बाबत कार्यवाही सुरु आहे. देशातील एकूण १४७३ बाजार समित्यांचा समावेश ई-नाममध्ये करण्यात आला आहे.

**ई-नाम योजनेतील ११८ बाजार समित्यांची राज्यातील सद्यस्थीती -**
**सप्टेंबर २०१७ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत**

- ११८ बाजार समित्यांमध्ये ई-ऑक्शन सुरु. एकूण  लाख क्विं. ५२६, किंमत - रु. १९,८८९/- कोटी.
- शेतमालाची गुणवत्ता तपासणीसाठी ११८ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित.
- ११३ बाजार समित्यांमध्ये असेईंग सुरु, एकूण १७.७० लाख लॉटस् चे असेईंग.
- ७९ बाजार समित्यांमध्ये ई-पेमेंट सुरु एकूण रक्कम रु. ४७४.५० कोटी.
- शेतकरी नोंदणी - १२.७४ लाख
- खरेदीदार (व्यापारी) नोंदणी - २२,७००
- आडते नोंदणी – १८,०६१
- एफ.पी.ओ नोंदणी - ३४९
- इंटर मंडी ट्रेड - ३.१० लाख क्विंटल, किंमत - १६४.५२ कोटी
- इंटर स्टेट ट्रेड - १.५१ लाख क्विंटल, किंमत - रु. ३२.५९ कोटी
- एफ.पी.ओ. ट्रेड - १६ एफ.पी.ओ., ९१६५ क्विं., किंमत - रु. ४.२२ कोटी
- प्रती लॉट बोली लावण्याचे सरासरी प्रमाण - ५.५२
- एकूण ग्राम सभा - १८२८

## ३) डी.एम.आय. भारत सरकार यांचे कडून संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता

डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत ॲगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणा-या बाजार समितीच्या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.१३५.०४ लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

## ४) कृषि पणन मंडळाची www.msamb.com वेबसाईट

- कृषि पणन मंडळाची www.msamb.com वेबसाईट कार्यरत
- मंडळाच्या विविध योजना, उपक्रम, प्रकल्प, कृषि पणन बाबत अद्ययावत माहिती
- वेबसाईट मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध
- बाजार समित्यांकडुन बाजारभाव माहितीचे संकलन
- वेबसाईटमार्फत ऑनलाईन बाजारभाव व आवक उपलब्ध
- महीन्याला साधारण १ लाख व्हीजिट्स

## ५) कृषि पणन मंडळ मोबाईल ॲप

कृषि पणन मंडळाचे मोबाईल ॲप MSAMB या नावाने गुगल प्ले स्टोअर व ॲप स्टोअरवर मराठी व इंग्रजी या दोन भाषांमध्ये विनामुल्य उपलब्ध आहे. या मोबाईल ॲप मध्ये खालील प्रमाणे माहिती उपलब्ध आहे.

- राज्यातील व इतर राज्यातील बाजार समित्यांमध्ये होणारी शेतमालाची दैनिक आवक व बाजारभाव.
- "कृषि पणन मित्र" हे मासिक मोबाईल ॲपवर उपलब्ध.
- राज्यातील बाजार समित्यांबाबत संक्षिप्त माहिती (प्रोफाईल).
- हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग या पाच दिवसांच्या कोर्स बाबत माहिती.
- हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटरबाबत माहिती.
- शेतमालाची विक्री अथवा खरेदी करण्यासाठी शेतमाल विक्रेता व खरेदीदार यांची माहिती.
- कृषि पणन मंडळ राबवित असलेले विविध प्रकल्प, योजना व उपक्रम बाबत माहिती..
- राज्यातील बाजार समित्यांना मोबाईल ॲपवर लॉगईन करुन दैनिक आवक व बाजारभाव भरण्याची सुविधा.

## ६) सांख्यिकीय माहिती

राज्यातील सर्व बाजार समित्यांची प्रशासकीय व सांख्यिकीय माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेस चा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केट फी तसेच बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकते प्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

## 'कृषि पणन मित्र' मासिक

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला 'कृषि पणन मित्र' मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक प्रत्येक महिन्याला मासिकाचे वर्गणीदार, राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रालयातील अधिकारी वर्ग इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती, राज्यातील ग्रंथालये आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था इत्यादींना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मासिकामध्ये कृषि पणन विषयक माहिती, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, सुगी पूर्व व सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर विविध तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.

**अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या**

| अ.क्रं. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०२४ | १६२३९ |
| २. | मे २०२४ | १६८६४ |
| ३. | जून २०२४ | १७३५७ |
| ४. | जुलै २०२४ | १७४७३ |
| ५. | ऑगस्ट २०२४ | १७४९० |
| ६. | सप्टेंबर २०२४ | १७४९३ |
| ७. | ऑक्टोबर २०२४ | १७७१० |
| ८. | नोव्हेंबर २०२४ | १७६९९ |
| ९. | डिसेंबर २०२४ | १७७७५ |
| १०. | जानेवारी २०२५ | १७९८४ |
| ११. | फेब्रुवारी २०२५ | १७७२२ |
| १२. | मार्च २०२५ | १७५४२ |

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे २ लाखापेक्षा जास्त वाचक आहेत.

## कृषि पणन मंडळाची दिनदर्शिका २०२५ व दैनंदिनी २०२५

सन २०२५ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई करुन, पणन मंडळाचे दिनदर्शिकेवर कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांची माहिती व दैनंदिनीमध्ये पणन मंडळाच्या योजना व्यतिरिक्त राज्यातील बाजार समित्या, कृषि विभाग, सहकार विभाग, मंत्रालयातील अधिकारी वर्ग यांची नावे, फोन नंबर, ई-मेल, पत्ते इत्यादीबाबत माहिती छापण्यात येते. सदर दिनदर्शिका व दैनंदिनी यांच्या प्रती राज्यातील बाजार समित्या, सर्व सहकारी संस्था, मंत्रालयातील पदाधिकारी व अधिकारी, पणन मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. सदर दिनदर्शिका व दैनंदिनीमार्फत कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी चांगला उपयोग होत आहे.

## प्रदर्शन / कार्यशाळा / चर्चासत्र / परीषद सहभाग व आर्थिक मदत

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांना करुन देण्याच्या दृष्टिकोनातून, राज्यातील विविध भागातील प्रदर्शनामध्ये सहभाग घेण्यात येतो. तसेच सदर प्रदर्शनामध्ये सक्षम अधिका-यांचे मंजुरीने सहभाग घेवून, मंडळाचे विविध योजना / उपक्रम यांचा प्रचार व प्रसिध्दी करुन, त्यामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यातील विविध १० प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतलेला आहे.

तसेच आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य देणे कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. सन २०२४-२०२५ मध्ये विविध कृषि पणन व इतर संबंधित ०३ संस्थांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

## कृषि पणन मंडळ जाहिरात

विविध वृत्तपत्रे , मासिकांचे विशेषांक, शेतकरी संघटना, पणन व सहकार संबंधित विविध संस्था यांना पणन मंडळाच्या विविध योजना, कार्य व उपक्रम यांची माहिती शेतकरी आणि समाजातील विविध घटकांना होणेकरिता कृषि पणन मंडळाची जाहिरात देण्यात येते. कृषि पणन मंडळाच्या विविध योजना व इतर उपक्रमांची प्रसिध्दी सदर माध्यमे करित असतात. चालू आर्थिक वर्षामध्ये राज्यातील १८ विविध वृत्तपत्रे, मासिकांचे विशेषांक यांना पणन मंडळाच्या विविध योजना, कार्य व उपक्रम यांची जाहिरात देण्यात आली. अशा प्रकारच्या जाहिरातीमुळे कृषि पणन मंडळाच्या योजना, कार्ये व उपक्रम यांची माहिती राज्यातील शेतकरी व संबधीत घटकांपर्यंत पोहचण्यास मदत होते.

## प्रसिध्दी :

कृषि पणन मंडळातर्फे आंबा महोत्सव , मिलेट महोत्सव, संत्रा महोत्सव तसेच इतर अनुषंगिक कार्यक्रम यांचे प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात आलेले आहे.

## दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

आर्थिक वर्ष २०२४ -२०२५ मध्ये दूरदर्शन केंद्र , मुंबई व दूरदर्शन केंद्र , पुणे वरुन "कृषीदर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाचे खालील अधिकारी यांचे ११ कार्यक्रम प्रसारित करण्यात आले.

| अ.क्र. | वक्त्याचे नाव | प्रसारण दिनांक | कार्यक्रम विषय |
|---|---|---|---|
| १. | श्री. सतिश वराडे | दि. ०८/०४/२०२४ | आंबा पल्प : निर्यात पूर्वतयारी - मुंबई |
| २. | श्री. सतिश वराडे | दि. २६/०४/२०२४ | आंबा पल्प : निर्यात पूर्वतयारी - पुणे |
| ३. | डॉ. सुभाष घुले | दि. ०६/०५/२०२४ | राज्यातील कृषी मालाच्या देशांतर्गत व्यापार संधी व आव्हाने- मुंबई |
| ४. | डॉ. सुभाष घुले | दि. १४/०६/२०२४ | राज्यातील कृषि मालाचा देशांतर्गत व्यापार, संधी व आव्हाने- पुणे |
| ५. | श्री. बाळासाहेब कातोरे | दि. ०६/०९/२०२४ | कृषि पणन मंडळाची शेतक-यांच्या फायद्याची शेतमाल तारण कर्ज योजना - पुणे |
| ६. | श्री. सतिश वराडे | दि. ०९/०८/२०२४ | निर्यातदार / उद्योजक घडविण्यासाठी हॉर्टिकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्स |
| ७. | श्री. बाळासाहेब कातोरे | दि. ०३/१०/२०२४ | कृषि पणन मंडळाची शेतक-यांच्या फायद्याची शेतमाल तारण कर्ज योजना - मुंबई |
| ८. | श्री. सतिश वराडे | दि. २२/११/२०२४ | केळी निर्यातीच्या राज्यातून संधी |
| ९. | श्री. मंगेश कदम | दि. १३/१२/२०२४ | कृषिमाल देशांतर्गत व्यापार, संधी व आव्हाने |
| १०. | श्री. मिलिंद जोशी | दि. ०२/०१/२०२५ | आंबा निर्यात – पूर्व तयारी |
| ११. | श्री. सतिश वराडे | दि. १३/०२/२०२५ | युरोप कृषिमाल निर्यातीकरिता शाश्वत बाजारपेठ |

## बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी / शेतकरी प्रशिक्षण

कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना तसेच बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रातील शेतक-यांना कृषि पणन मंडळामार्फत, तळेगांव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेर राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव मार्फत बाजार समिती अधिकारी / कर्मचारी यांना बाजार समित्यांचे कामकाज व नविन कायदे, संगणक विषयक प्रशिक्षण, बाजार समित्यांचा अर्थसंकल्प व लेखे विषयक टॅली संगणक प्रणाली इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. तर शेतक-यांसाठी हरितगृह व्यवस्थापन, नर्सरी व्यवस्थापन, शेड नेट, टिश्यू कल्चर, लॅन्ड स्केप, मार्केटिंग इ. विषयाअंतर्गत अहवाल काळात एकूण ९३ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले आणि या प्रशिक्षणाअंतर्गत एकूण ४७३३ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात आले.

# प) देशांतर्गत व्यापार विकास विभाग

## उदिष्टे

कृषी विपणन ही अतिशय महत्वाची क्रिया आहे. देशांतर्गत व्यापार विकास विभागाचा मुख्य उद्देश शासकीय योजना आणि कृषि पणन मंडळाने विकसित केलेल्या विविध उपक्रमांच्या मदतीने शेती व्यापार विकसित करणे हा आहे. शेतकरी आणि ग्राहकांसाठी थेट विक्री व्यवस्था तयार करणे, खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन करणे, शेतकऱ्यांसाठी शेतमाल विक्रीकरीता नवनवीन योजना तयार करणे, नवीन आणि संभाव्य बाजारपेठांची माहिती घेणे व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे ही देशांतर्गत व्यापार विकास विभागाची प्रमुख कार्ये आहेत.

## उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपक्रम

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम आंबा महोत्सवाद्वारे सन २००२ पासून राबविण्यात येत आहे. हा उपक्रम पुढे सुरु रहावा या उद्देशाने कृषि पणन मंडळाने फळ व धान्य महोत्सव या योजनेची सुरुवात केली.

## १. फळ व धान्य महोत्सव अनुदान योजना

आंबा, संत्रा, मोसंबी, द्राक्ष या सारखी हंगामी फळे तसेच धान्य यांचे थेट उत्पादक ते थेट ग्राहक विक्रीसाठी महोत्सवांचे आयोजन करण्याकरिता ही योजना राबविण्यात येते.

### लाभार्थी

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषि मालाच्या विपणनासंबधित स्थापित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग, उत्पादकांच्या सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था

### नियम व अटी

१. महोत्सवाचा कालावधी किमान ५ दिवसांचा असावा.
२. महोत्सवास प्रति स्टॉल रू.२००० /- प्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.
३. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.
४. महोत्सवासाठी जास्तीत जास्त रू १.०० लाख अनुदान देय राहील.
५. फळ व धान्य महोत्सव आयोजनासाठी लाभार्थीस एका आर्थिक वर्षात एकदाच अनुदान देय राहील.
६. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा.बॅनर्स, जाहीरात, बातम्या, बॅकड्रॉप, हँन्ड बील इ. मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजकांवर बंधनकारक राहील.
७. कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये स्टॉल घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करून देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.
८. महोत्सवाचा अहवाल व काही निवडक फोटो कृषि पणन मंडळाच्या 'कृषि पणन मित्र' मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी पणन मंडळाकडे सादर करावेत.

९. महोत्सव आयोजनासाठीचा परिपुर्ण प्रस्ताव कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह सादर करणे आवश्यक आहे. महोत्सव आयोजनासाठीचा परिपुर्ण प्रस्ताव कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह सादर करणे आवश्यक आहे.

१०. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यास एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त पाच (५) महोत्सावामध्ये किमान १० स्टॉल अथवा कमाल ५० स्टॉल गृहीत धरुन रू.२०००/- प्रति स्टॉल प्रमाणे कमाल अनुदान रु.१.०० लाख देय राहील.

११. महोत्सवांमध्ये केवळ उत्पादकांना सहभागी होता येईल. व्यापाऱ्यांना सहभागी होता येणार नाही. तसेच, सहभागी उत्पादकांना मार्केटमधून शेतमाल खरेदी करुन विक्री करता येणार नाही. असे आढळून आल्यास लाभार्थी अनदानासाठी अपात्र ठरविला जाईल.

१२. महोत्सव आयोजन करणेसाठी अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (Fire-NOC) घेणे बंधनकारक राहील.

१३. महोत्सवातील शेतमालाची प्रत, दर व इतर अनुषंगिक व कायदेशीर बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही. तथापी चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे स्टॉलधारकांवर बंधनकारक राहील व याची खातरजमा करणे आयोजकांवर राहील.

१४. पुणे शहरात पणन मंडळामार्फत ज्या ठिकाणी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल, अशा महोत्सव ठिकाणांपासून ५ कि.मी. अंतरामध्ये पणन मंडळाच्या 'फळ व धान्य महोत्सव अनुदान योजने' अंतर्गत आंबा महोत्सव आयोजनास परवानगी देण्यात येणार नाही.

१५. महोत्सवाकरिता इतर कोणत्याही शासकिय योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.

१६. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रू.१००/- च्या स्टँपपेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

## सन २०२४-२५ मध्ये राज्यात महोत्सवाचे आयोजन

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे सहकार्याने पी.एम.टी. डेपो शेजारी, मार्केटयार्ड येथे दि १ एप्रिल ते ३ जून २०२४ या कालावधीत आंबा महोत्सव घेण्यात आला. यामध्ये कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील सुमारे ८८ हापूस आंबा उत्पादक यामध्ये सहभागी झालेले होते. या महोत्सवाद्वारे सुमारे २.४० लाख डझन आंबा शेतक-यांकडून थेट ग्राहकांना विक्री करण्यात आलेला असून रू.१५.५० कोटींची उलाढाल झाली.

तसेच याव्यतिरिक्त पणन मंडळाच्या फळ महोत्सव योजनेअंतर्गत ठाणे, सातारा रोड-पुणे, वाघोली-पुणे, नारायणगाव (जुन्नर) व सांगली येथे ५ दिवसीय महोत्सवांचे अभियान यशस्वी करण्यात आले. या महोत्सवांस स्थानिक रहिवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळालेला आहे.

**मुख्यालय व फळ व धान्य महोत्सव अनुदान योजनेअंतर्गत सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेले महोत्सव -**

**सन २०२४ मध्ये आयोजित आंबा, मिलेट व धान्य महोत्सव उत्पादक संख्या व उलाढाल तपशिल**

| अ. क्र. | विभागाचे नाव | ठिकाण | कालावधी | शेतकरी संख्या | आंबा विक्री (डझनमध्ये) | मिलेट / फळ धान्य उलाढाल रु. | आंबा उलाढाल कोटी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्यालय | आंबा / मार्केटयार्ड | दि.१.४.२०२४ ते दि.३१.५.२०२४ | १११ | २४०००० | ० | १५.५० |
| २ | | मिलेट / गणेश कला क्रिडा रंगमंच, पुणे | दि.८ ते १२ जानेवारी २०२५ | ४२ | ० | ०.३५ | ० |
| ३ | | संत्रा / गांधी भवन, कोथरूड | दि.२० ते २६ फेब्रुवारी २०२५ | २० | १०००० | ० | ० |
| ४ | नाशिक | मिलेट / नाशिक | दि.३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ | ३४ | ० | ०.१२ | ० |
| ५ | रत्नागिरी | आंबा/ठाणे | दि.१ ते १२ मे २०२४ | ४५ | १४४०० | ० | १.०५ |
| ६ | कोल्हापूर | आंबा / कोल्हापूर | दि.१९ ते २३ मे २०२४ | २५ | १००५३ | ० | ०.४१ |
| ७ | | आंबा / सांगली | दि.२५ ते २९ मे २०२४ | २२ | ७३५४ | ० | ०.२३ |
| ८ | नागपूर | आंबा / नागपूर | दि.१६ ते १९ मे २०२४ | २७ | ८००० | ० | ०.४० |
| | | मिलेट / नागपूर | | ३० | ० | २५.५४ | ० |
| ९ | अमरावती | आंबा / अमरावती | दि.२३ ते २६ मे २०२४ | १० | २६५० | ० | ०.११ |
| | | मिलेट / अमरावती | | ३२ | ० | १५.८ | ० |
| १० | छत्रपती संभाजीनगर | आंबा / छत्रपती संभाजीनगर | दि.२३ ते २६ मे २०२४ | २७ | ५५०७ | ० | ०.२६ |
| | | मिलेट / छत्रपती संभाजीनगर | | २५ | ० | ९.०९ | ० |
| ११ | पुणे | फळ व धान्य /नारायणगाव | दि.८ जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२५ | ५० | ० | ०.३० | ० |
| १२ | | आंबा / सातारा रोड | दि.१७ ते २१ एप्रिल २०२४ | ३० | ९८०० | ० | ०.६२ |
| १३ | | आंबा / वाघोली | दि.२५ ते २९ एप्रिल २०२४ | २० | ३३६७ | ० | ०.१७ |
| १४ | | आंबा / चिंचवड | दि.१५ ते १९ मे २०२४ | १९ | ५११५ | ० | ०.३५ |
| **एकंदर एकूण -** | | | | **५६९** | **३१६२४६** | **५१.२०** | **१९.१०** |

सन २०२४-२५ मध्ये मुख्यालयाद्वारे ३ व विभागीय कार्यालयामार्फत ६ तसेच फळ व धान्य महोत्सव अनुदान योजनेअंतर्गत ५ असे एकूण १४ महोत्सवांचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याद्वारे सुमारे ३.२५ लाख डझन आंबा तसेच संत्रा विक्रीद्वारे रक्कम रू. १९.१० कोटींची उलाढाल झाली.

**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ अंतर्गत मुख्यालय व विभागीय कार्यालयामार्फत मिलेट महोत्सवांचे आयोजन**

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. त्याअनुषंगाने राज्यात प्रशासकीय विभागांमार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रमांचा भाग म्हणून मुख्यालय व विभागीय कार्यालय स्तरावर "मिलेट महोत्सव" आयोजित करण्यात आले होते. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र | विभागाचे नाव | सहभागी मिलेट उत्पादक व प्रक्रियादार संख्या | उलाढाल रू. (लाख) |
|---|---|---|---|
| १ | मुख्यालय, पुणे | ४२ | ३५.०० |
| २ | विभागीय कार्यालय, नाशिक | ३४ | १२.५० |
| ३ | विभागीय कार्यालय, नागपूर | ३० | २५.५४ |
| ४ | विभागीय कार्यालय, अमरावती | ३२ | १५.८० |
| ५ | विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | २५ | ९.०९० |
| | **एकुण** | **१६३** | **९७.९३** |

मिलेट (तृणधान्य) महोत्सवामध्ये १६३ उत्पादक व प्रक्रियादार यांनी सहभागी होऊन त्याद्वारे रु.९८.०० लाखाची उलाढाल झाली आहे.

## २) आंतरराज्य शेतमाल व्यापार : रस्ते वाहतूक अनुदान योजना

महाराष्ट्र राज्य फळे व भाजीपाला उत्पादनात देशात आघाडीवर आहे. कांदे, टोमॅटो, डाळींब, द्राक्षे, केळी व आंबा हे प्रमुख फळे आणि भाज्या आहेत. फळे आणि भाजीपाला नाशवंत आहे आणि अयोग्य हाताळणी आणि साठवण पद्धतीमुळे तसेच वाहतूक विलंबामुळे फळे व भाजीपाल्यांचे काढणीपश्चात सुमारे २० ते ३० टक्के नुकसान होते. मागणी आणि चांगला दर यामुळे निर्यातीप्रमाणे देशांतर्गत व्यापार सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. मूलतः शेतकरी त्यांच्या दैनंदिन नित्यक्रमांमध्ये बदल करण्याच्या मानसिकतेत नसतो यामुळे वाहतूक भाडे भरुन शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी तयार होत नाही. शेवटी ते त्यांचे उत्पादन जवळच उपलब्ध असलेल्या बाजारपेठेत विकतात.

तथापि, अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना इतर राज्यात पाठविण्याचे महत्त्व लक्षात आलेले आहे. म्हणून या परिस्थितीचा आणि व्यावहारिक बाबींचा अभ्यास करून आंतरराज्य व्यापारास प्रोत्साहन देण्यासाठी कृषि पणन मंडळाने रस्ते वाहतूक अनुदान योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या योजनेअंतर्गत दि.३१ मार्च २०२३ पर्यंत देशांतर्गत रस्ते वाहतूक भाड्यामध्ये अनुदान (Transport Subsidy) देण्यात येणार आहे.

**सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१. सदर योजना केवळ महाराष्ट्रातून रस्ते वाहतूकीद्वारे परराज्यात शेतमाल वाहतूक करून प्रत्यक्ष विक्री करण्यात येणाऱ्या व्यवहारासाठी लागू राहील.

२. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था योजनेअंतर्गत अनुदान मिळणेस्तव पात्र असतील.

३. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या सभासदांनी स्वत: उत्पादित केलेला शेतमालच संबधीत राज्यामध्ये पाठविणे आवश्यक असेल.

४. योजनेंतर्गत कामकाज सुरू करणेपुर्वी अर्जदार संस्थेने पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

५. सदर योजना आंबा, केळी, डाळींब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या नाशवंत पिकांसाठीच लागू राहील. तसेच यामध्ये नमूद नसलेला नाशवंत शेतमाल परराज्यात विक्री करावयाचा झाल्यास लाभार्थी संस्था/ कंपनीने तसा स्पष्ट उल्लेख करून पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

६. सदर योजनेमध्ये रस्तेमार्गे प्रत्यक्ष वाहतूक होणाऱ्या शेतमालावर अनुदान देय राहील. यामध्ये इतर कोणत्याही अनुषंगिक खर्चाचा अंतर्भाव असणार नाही तसेच शेतमाल प्रत्यक्ष विक्री झालेनंतरच अनुदान देय राहील.

७. या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष वाहतूक केलेल्या अंतरानुसार खालीलप्रमाणे अनुदान देय असेल.

| अ.क्र. | अंतर | देयअनुदान |
|---|---|---|
| १ | किमान ३५० ते ७५० कि. मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.२०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| २ | ७५१ ते १००० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.३०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ३ | १००१ ते १५०० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.४०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ४ | १५०१ ते २००० कि.मी.पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ५ | २००१ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.६०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ६ | सिक्कीम, आसाम, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, मेघालय व त्रिपुरा या राज्यासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.७५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |

८. महाराष्ट्रातील सीमेलगतच्या जिल्ह्यातील शेतमाल नियमीतपणे लगतच्या परराज्यात जात असल्याने अपरंपरागत व दूरवरील बाजारपेठांमध्ये शेतमाल पाठविणे अर्थक्षम होण्याच्या दृष्टीने ३५० कि.मी.पेक्षा कमी अंतरावरील वाहतूकीस कोणतेही अनुदान देय असणार नाही.

९. या योजनेअंतर्गत एका लाभार्थी शेतमाल उत्पादक सहकारी संस्था/उत्पादक कंपनीस एका आर्थिक वर्षात कमाल रू.३.०० लाख एवढे वाहतूक अनुदान देय असेल. सदर अनुदान केवळ महाराष्ट्रातून इतर राज्यात केलेल्या एकेरी वाहतूकीस लागू असेल.

१०. या योजनेअंतर्गत बिगर कृषिमालाची वाहतूक केल्याचे आढळल्यास त्यासाठी अनुदान देय असणार नाही.

११. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेने वाहतूकदारास देय असलेली वाहतूक भाड्याची रक्कम धनादेश/आरटीजीएस/ऑनलाईन बँकींगद्वारे अदा करणे बंधनकारक राहील.

१२. शेतकरी उत्पादक कंपनी/ सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाच्या प्राप्त विक्री रक्कमेतून अनुषंगीक खर्च जसे, शेतमालाची हाताळणी, विरळणी, वर्गीकरण, पॅकींग, हमाली, वाहतुक, व कंपनी/संस्थाचे सर्व्हिस चार्जेस इत्यादी खर्च, कपात करुन उर्वरीत रक्कम संबंधित उत्पादक सभासदांच्या खात्यावर वर्ग केल्यानंतर वाहतूक अनुदानासाठी अर्ज करू शकतील. कपात रक्कम व अनुषंगिक आर्थिक व्यवहार ही संबधित कंपनी/संस्था व उत्पादक सभासद शेतकरी यांची अंतर्गत बाब राहील. याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा कोणताही संबध असणार नाही.

१३. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाला गुणवत्ते अभावी अथवा अन्य कारणामुळे विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जबाबदार असणार नाही तसेच सदर प्रकरणी वाहतूक अनुदान देय असणार नाही.

१४. अनुदान संपुर्णपणे नामंजूर, अंशत: मंजूर अथवा पुर्णपणे मंजूर करण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारावर बंधनकारक असेल. तसेच, योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये उचित बदल करण्याचे अधिकार पणन मंडळास राहतील.

१५. संबंधीत शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी या योजनेअंतर्गत परराज्यात पाठविण्यात आलेल्या वाहतूक खर्चाचे अनुदान मागणी प्रस्ताव शेतमाल विक्रीनंतर ३० दिवसांत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत.

१६. परराज्यात शेतमाल पाठवित असताना १ कन्साईनमेंट मध्ये शेतकरी उत्पादक कंपनी / संस्थेच्या किमान ३ उत्पादक शेतकरी सभासदांचा शेतमाल एकत्रितपणे पाठविणे आवश्यक राहील.

## ३) भौगोलिक नोंदणी मानांकन कक्ष

एखाद्या भौगोलिक प्रदेशातील वैशिष्ठ्यांमुळे हवामान, संस्कृतीमुळे, एखाद्या उत्पादनात, त्याच्या उत्पादन प्रक्रियेत अनेक वर्ष दर्जा, चव, रंग, वास उतरत असतील, ते गुणधर्म वर्षानुवर्ष कायम राहत असतील, तर अशा उत्पादनांची नोंदणी रजिस्ट्रार ऑफ जिओग्राफिकल इंडिकेशन कार्यालय, चेन्नई येथे करून भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त करता येते.

भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांना इतर प्रदेशातल्या अनधिकृत उत्पादनांपासून भेसळ होणे, रास्त किंमतीपेक्षा कमी किंमत मिळणे यासारख्या गोष्टींपासून दहा वर्षे संरक्षण प्राप्त होते. तसेच संरक्षण कालावधी वाढविणे शक्य होते. यामुळे राज्यातील स्थानिक कृषि उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होते.

सद्यस्थितीत राज्यामध्ये एकूण ४० प्रकारच्या कृषि उत्पादनांना भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन प्राप्त झाले आहे. राज्यातील कृषि हवामान, विभागांमुळे प्रत्येक भागातील विविध वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने आहेत. अशा उत्पादनांची नोंदणीकरीता नोंदणीकृत शेतकरी समूह, शेतकरी गट, उत्पादक संघ इत्यादींना सल्ला सेवा देण्याकरीता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामध्ये भौगोलिक मानांकन नोंदणी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

**कक्षामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा**

- भौगोलिक मानांकनासाठी संभाव्य उत्पादनाची मालकी मिळवण्यासाठी उत्पादनाच्या तपशिलवार अर्जदार संस्थेच्या माहितीनुसार अहवाल तयार करणे (उत्पादनांची वैशिष्ट्ये, भौगोलिक मानांकनासाठी नाव आणि लोगो, मालाचे वर्णन, उत्पादनाचे भौगोलिक क्षेत्र आणि नकाशा इ.)

- अर्जदार संस्थेच्या वतीने रजिस्ट्रार ऑफ जिओग्राफिकल इंडिकेशन्स, चेन्नई प्राधिकरणाकडे अर्ज सादर करणे.
- नोंदणीच्या प्रत्येक टप्प्यावर संबंधित प्राधिकरणाकडे पाठपुरावा करून त्रुटी पूर्तता करणे.
- प्राधिकरणाकडे हरकतीच्या प्रत्येक सुनावणीस उपस्थीत राहणे, भौगोलिक मानांकनाची प्रक्रिया पुर्ण करणे.
- भौगोलिक मानांकन प्राप्त झालेनंतर अधिकृत वापरकर्ते वाढवण्यासाठी मार्गदर्शन, तसेच त्यांच्या उत्पादनाच्या विपणनासाठी मार्गदर्शन, भौगोलिक मानांकन उत्पादनांच्या विकासाकरिता विविध योजनांची अंमलबजावणी.

**भौगोलिक चिन्हांकन / मानांकन अंतर्गत नोंदणीचे फायदे**

- भौगोलिक चिन्हांकन मानांकीत नोंदणीकृत उत्पादनाचे अधिकृत वापरकर्ता म्हणून ओळख निर्माण होते.
- अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी केल्यामुळे भौगोलिक चिन्हांकनाचा लोगो लावून विक्री करता येते. पिकाची वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्माची ओळख निर्माण करून त्याची ग्राहकाला विक्री करण्यास मदत होते.
- भौगोलिक चिन्हांकनाचा अधिकृत लोगो वापरून विक्री केल्यामुळे अधिक (प्रिमियम) किंमत मिळण्यास मदत होते.
- भौगोलिक चिन्हांकन प्राप्त पिकाची निर्यातदारामार्फत निर्यात करता येते किंवा स्वत: निर्यात करता येते. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्रँड विकसित होण्यास मदत होते.

**भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणी करण्याकरिता कोण अर्ज करू शकतो?**

नोंदणीकृत व्यक्ती समूह/शेतकरी गट/ शेतकरी उत्पादक कंपन्या, संघ किंवा उत्पादक संघटना इ.जे त्या उत्पादनाच्या हिताशी संबंधित असतील तेच या मानांकन नोंदणीसाठी अर्ज करू शकतात.

## ४. राज्यातील भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार, प्रसिद्धी, नोंदणी व मुल्यसाखळी विकसीत करणेसाठी ४ स्वतंत्र योजना

### योजना क्र. (१) भौगोलीक चिन्हांकन/मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार व प्रसिध्दीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनासाठी अनुदान योजना

**लाभार्थी:** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणा-या संस्था.

**लाभाचे स्वरूप:** एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजनासाठी कमाल मर्यादा रु.१०,००० प्रति प्रशिक्षण अनुदान देय.

### योजना क्र. (२) भौगोलीक चिन्हांकन/ मानांकन नोंदणीसाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्याकरिता नोंदणी शुल्कासाठी अनुदान योजना.

**लाभार्थी: उत्पादक शेतकरी** (भौगोलिक मानांकन मालकी असणा-या संस्थेचे माध्यमातून)

**लाभाचे स्वरूप**: भौगोलिक मानांकन नोंदणीसाठी शासकीय नोंदणी शुल्कापोटी येणाऱ्या खर्चाचे ५०% अथवा प्रती लाभार्थी कमाल रु.२००/- मर्यादेपर्यंत अनुदान शेतकऱ्यांसाठी संबंधित कृषि उत्पादनाचे मालकी असणा-या संस्थेला देण्यात येईल.

**योजना क्र. (३) भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन नोंदणी प्राप्त उत्पादनांचे मुल्यसाखळी विकसीत करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान योजना.**

**उद्देश:** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन नोंदणीकृत नैसर्गिक गुणवत्ता असलेली उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहचवणे, भेसळीला प्रतिबंध करणे, विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात उत्पादीत होणारी उत्पादने चिन्हासह विक्री करणेसाठी बाजार विकासाकरिता (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) अर्थसहाय्य करणे.
**लाभार्थी** - भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणारी संस्था.
**स्वरुप** - उत्पादनांच्या बाजार विकासाकरिता (सुयोग्य पॅकिंग, लेबलिंग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) येणाऱ्या खर्चाच्या ५०% जास्तीत जास्त ३,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य कृषी उत्पादनाचे मालकी असणा-या संस्थेला देण्यात येईल.

**योजना क्र. (४) कृषी पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव उपक्रमामधील भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरिता अर्थसहाय्य योजना.**

**उद्देश:** भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविणे.
**लाभार्थी** - भौगोलिक चिन्हांकन/ मानांकन मालकी असणारी संस्था.
**स्वरुप** - प्रति स्टॉल रु. ३०००/-अर्थसहाय्य.

उपरोक्त ४ ही योजनांचे प्रस्ताव संबंधित संस्था / शेतकरी यांनी कार्यक्षेत्र लक्षात घेवून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

सदर नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत सन - २०२५ मध्ये पुरंदर अंजिर या भौगोलिक मानांकन अधिकृत वापरकर्ते नोंदणी शुल्क अनुदान अंतर्गत ११२ शेतक-यांना प्रति शेतकरी रू.२००/- याप्रमाणे अनुदान रक्कम रू. २२,४००/- (अक्षरी- रुपये बावीस हजार चारशे फक्त) अनुदान अखिल महाराष्ट्र अंजीर उत्पादक संशोधन संघ, पुणे यांना वितरीत करण्यात आलेले आहे.

# फ) तळेगाव शेती विभाग

कृषि पणन मंडळाच्या शेती विभाग,तळेगाव अंतर्गत १५० एकर जमिन क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मुख्यफार्म व गिलबिल पट्टी असे दोन वेगवेगळया ठिकाणी असून मुख्यफार्म हे प्रक्षेत्र तळेगाव गाव भागास लागून असून गिलबिल पट्टी हे प्रक्षेत्र मुंबई – पुणे महामार्गास लागून आहे.

**गिलबिल पटटी प्रक्षेत्र तपशील**

| अ.क्र | गिलबिल पटटी तपशिल | क्षेत्र (एकर) |
|---|---|---|
| अ) | राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था | २८.०० |
| ब) | निर्यात सुविधा केंद्र | ०१.०० |
| क) | फळबाग लागवडी खालील क्षेत्र (आंबा, पेरु, नारळ व आवळा) | १२.०० |
| ड) | नाला,रस्ते, इमारत व पडीक क्षेत्र | ०९.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **५०.००** |

**फळबाग**

सदर प्रक्षेत्रावरील फळबागचे व्यवस्थापन जानेवारी २०१९ पासून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था पाहत आहे.

**मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील**

| अ.क्र | मुख्यफार्म तपशिल | क्षेत्र (एकर) |
|---|---|---|
| अ) | लागवडी योग्य क्षेत्र / कनव्हेशन सेंटर उभारणी | ३०.०० |
| ब) | तलावाखालील क्षेत्र (पाण्याचे क्षेत्र – अंदाजे २७ - २८ एकर) | ४१.०० |
| क) | मत्स्यतळी | ०१.०० |
| ड) | नाला, रस्ते, इमारत, पडीक क्षेत्र, मत्स्यतळी व न्यायालयीन बाब | २८.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **१००.००** |

- मुख्यफार्म येथील जमीनीवर कन्वहेशन सेंटर उभारणी बांधकाम चालू करण्यात आलेले आहे.
- मुख्यफार्मवरील तलाव (स.नं.३५१) मच्छिमारीसाठी मावळ तालुका मच्छिमार को-ऑप सोसायटी, तळेगाव दाभाडे यांना तीन वर्ष करारावर देण्यात आलेला आहे.
- मासेमारीसाठी २० गुंठेचे दोन तळी (स.नं.३३८) तीन वर्षासाठी भाडेकराराने देण्यात आली आहेत.
- स.नं. ३४१/१ हद्द कायम करुन घेण्यात आली असून मे. आकार फांऊड्री लि. यांनी घेतलेल्या हरकती संबंधी न्यायालयात दावा बाबत समझोता झाला असून हद्द वाद मिटविण्यात आला आहे. याबाबत अँदाजे ६० गुंठे वादातील जागा पणन मंडळाच्या ताब्यात आली आहे.
- सदर जमीनी संबंधीत वि.सह.नि.सह.संस्था सहकार विभाग,पुणे, वडगाव मावळ न्यायालयातील व मुंबई उच्च न्यायालयातील दावे संदर्भातील कामकाज मुख्यालय, पुणे यांचेशी समन्वय ठेवून चालू आहे.

***